# शोध जीवनाचा

लोक देखील किती विचित्र आहेत कि जे स्वतःचे जीवन या स्मशानभूमीत शोधत आहे. या दुनियेची रीतच खूप न्यारी बेढब आहे. जीवन असतांना जीवनाचे महत्व कुणी जाणत नाही आणि मृत्यूनंतर मृतदेवहावर तेल-फुल चढवतात, फुले माळा टाकून जाळतात किंवा पुरतात. मकबरे बनवले जातात, कुणी महल बनवतात. त्यांचे पुतळे बांधले जातात. स्मारक बांधले जातात ते कशासाठ्ठी माहीत आहे काय ? तर आपण मृत्यू नंतर जिवन शोधत असतो असे तर या दुनियेत प्रत्येक व्यक्ति काही ना काही शोधतच असतो ही दुनिया जिज्ञासूंची आहे. कोणी शांती शोधत आहे, कुणी सुख तर कुणाला सुंदर काया, कुणाला धन-दौलत आणि पैसा हवा आहे. कर्मचारी, अधिकारी, नेता प्रत्येक व्यक्ति खुर्चीच्या शोधात आहेत. जेलमध्ये पडलेला कैदी खिडकीच्या शोधात आहे, कुणी मुलिंच्या तर कुणी मुलांच्या शोधात आहे, कुणी बंधनामध्ये जाणुन-बुजुन बांधु बघतो आहे तर कुणाला या संसारातून मुक्तीची शोध आहे.

पोलीस चोरांना शोधत आहे चोरांच्या धोक्यामध्ये सावकारांची तलाशी घेतली जात आहे. चोर-पोलिसांच्या खेळात चोर आपला रस्ता शोधूनच घेतो. चोर देखील शोधत असतो मोठ्ठा माणूस जास्त जड खिशावाला हे शोधण्याचे काम थकवणारेच आहे नाही काय? मनुष्य जीवन शोधता-शोधता तुटून जातो आणि शेवटी तो देखील विसरुन जातो की तो काय शोधत होता?

तसे पाहता सर्वात मोठ्ठा शोधयाचा काम त्या परमात्माच आहे. तो ही काही कमी शोधकर्ता नाही करोडो मनुष्यांमधुन तो अशा काही मोत्यांना काढतो की जे स्वर्णिम संसाराच्या माळेमध्ये गुंफले जातात. ज्यांची चमक-दमक दोन युगांपर्यंत गायली जाते. ज्यांच्या समृद्धीची पताका या संपुर्ण भु-तलावरती फिरवली जाते ज्यांची पवित्रतेची चमक या कलयुगात देखील मंदिरांमध्ये प्रकाश देत असते. ज्यांच्या कर्मांची आज ही मनुष्य पुजा करतात त्यांचे गायन-पुजन करतात परमात्मा अति सुक्ष्म दुर्बिणीतुन त्या विखुरलेल्या मोत्यांना

शोधत आहेत.  हे मोती म्हणजेच मनुष्य आत्मारुपी होय.  काही मनुष्य आत्मे रुपी मोती हे या विकाररुपी वाईट चोरांच्या तावडीत सापडले आहेत.  परमात्मा अश्या आत्मारुपी मोत्यांना पुन्हा सांगत आहेत की जर माळेचा मोती बनायचे आहे तर आपल्या मनामध्ये झाकुन बघा व आपल्यामध्ये असणाऱ्या काम, क्रोध आदि बहुरुपि चोरांना शोधा ज्यांनी माझी नजर वाचवुन तुम्हाला माझ्यापासुन दूर केले व या कलयुगी दरीत ढ्केवले होते.

आता विकारांचे व वाईट संगतीचे सर्व नाते तोडा.  तुम्हाला ज्या शांती व सुखाची आवश्यकता होती. तुम्ही जीचा शोध घेत होता ती घेऊन मी आलो आहे.

ज्यामुळे तुम्ही सदाकाळासाढ्ी तृप्त होऊन जाताल नंतर कुढ्लीच शोध करण्याची गरज राहणार नाही. त्या करिता जागे व्हा!  आणि वेळेचे महत्व ओळखा.  आता काही शोधण्यात वेळ खराब नका करु.  कारण परमात्म्याच्या दिव्य चक्षुंनी तुम्हाला शोधले आहे.  आणि वर्तमानकाळी तो आत्मारुपी मोतींना जन्म-जन्मांतरासाढ्ी ज्ञान व गुणांनी भरपुर करत आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com